D:\APA 2024\Letter 2024.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा :

१) महाराष्ट्र शासन कृषि व पदूम विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.ॲजीयू-३७१९/ सिआर-४१/६-ए दिनांक १२.८.२०२१

२) महाराष्ट्र शासन कृषि व पदूम विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.ॲजीयू-३७२१/ सिआर-१५०/६-ए दिनांक १९.९.२०२२

३) महाराष्ट्र शासन कृषि व पदूम विभाग मंत्रालय, मुंबई अधिसुचना क्र.मकृप-१०२३/सिआर-२४/६-ए दिनांक ३०.६.२०२३

४) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक २०२४/प्र.क्र.१३०१/कॅस /आस्था-१/२६०१ दिनांक २१ मे २०२४

५) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक २०२४/प्र.क्र.१३०१/कॅस /आस्था-१/२६०२ दिनांक २१ मे २०२४

**कॅस अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक कामगिरी निर्देशांक (ॲपीआय स्कोअर कार्ड) तयार करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.**

**विद्यापीठ परिपत्रक**

क्रमांक : २०२४/प्र.क्र.१३०१/कॅस /आस्था-१/3163

दिनांक : २६ जुन २०२४ (२७)

**परिपत्रक :**

संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिका-यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र.२ व ३ वरील शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगानूसार शिक्षकवर्गीय अधिका-यांना कॅस अंतर्गत वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्याबाबतच्या पात्रता, तरतूदी व इतर अनुषंगीक बाबी स्पष्ट केलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र. ४ अन्वये विद्यापीठातील सर्व शिक्षकवर्गीय अधिका-यांकडून कॅस अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक कामगिरी निर्देशांक (ॲपीआय स्कोअर कार्ड) तयार करण्यासाठी दिनांक ३० जुन २०२४ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र. ५ अन्वये कॅस अंतर्गत एएल-१० वरून ११, एएल-११ वरून १२ व एएल-१२ वरून १३ ए वेतनश्रेणी मंजूर करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते.

सदर प्रस्ताव सादर करण्यासाठी शिक्षकवर्गीय अधिका-यांकडून मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती करण्यात येत आहेत. त्यामुळे संदर्भिय ४ व ५ वरील परिपत्रकान्वये मागविण्यात आलेले प्रस्ताव सादर करावयाची अंतीम दिनांक **वाढवून दिनांक ३१ जुलै २०२४** करण्यात येत आहे.

उपरोक्त मुदत ही अंतीम असून यानंतर मुदत वाढवून मिळणार नाही. विहित मुदतीत प्रस्ताव सादर न केल्यास अथवा अपुर्ण प्रस्ताव सादर केल्यामुळे कॅस अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यास अपात्र झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधिताची राहील याची नोंद घ्यावी.

**मा.कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.**

(पु.को.काळे)
कुलसचिव

**प्रत :**

१. संचालक (सर्व) वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयाच्या कार्यरत पात्र शिक्षकवर्गीय अधिका-याच्या निर्देशनास आणून द्यावे.

२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

३. मा.कुलगुरू यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.